# विधी अधिकारी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या मुख्य कार्यालयात कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता विधी अधिकाऱ्याची मानधन तत्वावर नेमणूक करावयाची असून, सनद मिळाल्यापासून १० वर्षे वकिली व्यवसायाचा अनुभव असणे आवश्यक आहे. विधी अधिकारी नेमणुकीकरीता दिनांक २८/११ /२०२४ रोजीच्या दैनिक महाराष्ट्र टाईम्स मुंबई आवृत्ती या वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. विधी अधिकारी या पदाची कर्तव्य व जबाबदाऱ्या खालील तपशिलात नमूद केलेल्या आहेत. इच्छुकांनी अपेक्षित मानधनासह महामंडळाच्या ई-मेल lokshahirasdc@gmail.com / lasdcmumbai@gmail.com वर किंवा महामंडळाचे मुख्य कार्यालयात दिनांक ०५.१२.२०२४ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज करावेत.

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व महामंडळाच्या वतीने प्रतिज्ञापत्र तयार करणे तसेच सर्व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. सन २०१२ ते २०१५ या कालावधीत महामंडळामध्ये झालेल्या घोटाळ्याच्या अनुषंगाने दाखल झालेल्या गुन्ह्याबाबत राज्य गुन्हे अन्वेषण विभाग व सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे.
३. सन २०१२ ते २०१५ या कालावधीत महामंडळामध्ये झालेल्या घोटाळ्याच्या अनुषंगाने जप्त केलेल्या वाहनांच्या संबंधित न्यायालयामार्फत ताबा घेऊन महामंडळाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने लिलावाद्वारे विक्री करणे.
४. राज्य गुन्हे अन्वेषण विभाग / सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे.
५. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.
६. अपिलाचा मसुदा तयार करणे, संबंधित वकीलाकडे पाठविणे, अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
७. शासन प्रतिवादी प्रकरणात प्रतिज्ञापत्र सादर करणे.
८. महामंडळ वेळोवेळी सोपविल ती कायदेविषयक कामे करणे.
९. आठवड्यातील कमीत कमी ४ (चार) दिवस प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहून सर्व शाखेंशी संबंधित कायदेविषयक बाबी हाताळणे, सल्ला देणे.
१०. विधी अधिकारी यांनी स्वत:चे दैनंदिन कार्यालयीन कामाचे (न्यायविषयक) कार्यविवरण कार्यालयात नोंद ठेवणे आवश्यक राहिल.
११. कामाचे मासिक विवरण पत्र घेऊन मानधन अदा केले जाईल.
१२. मुंबई व बाहेरील जिल्हा /प्रादेशिक कार्यालयाचे न्यायालयीन कामाकरीता झालेल्या प्रवास खर्च व दैनिक भत्ता देय राहिल.
१३. संस्थात्मक अथवा शासकीय सेवेचे कोणतेही नियम आपणांस लागू राहणार नाहीत. आपल्या कामाबाबत सनियंत्रण व पर्यवेक्षकीय अधिकारी हे मा.व्यवस्थापकीय संचालक/महाव्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई हे राहतील.
१४. अ.क्र.१ ते १३ बाबींचे आपणाकडून पालन न झाल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा करार रद्द करण्याचा अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

आदेशावरुन